**OFFICE OF THE**
**CHIEF CONSERVATOR OF FORESTS,**
**CHANDRAPUR CIRCLE, CHANDRAPUR,**
**CIVIL LINE, NAGPUR ROAD,**
**CHANDRAPUR – 442401**

मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालय
सिव्हील लाईन, नागपूर रोड, चंद्रपूर - 442401
Phone (07172) 256279, Fax 07172-252232
E-mail: ccfchandrapur@gmail.com

Sub :- Forest Land- Chandrapur
Diversion of 46.04 ha. Forest land for Penganga Opencast Mine under Forest (Con.) Act,1980.

No.Desk 3(1)/land/CR258/656
Chandrapur, date : 14/5/15

**संदर्भ :-** उपवनसंरक्षक, मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-सर्व्हे/WCL/216 दिनांक 5.5.2015.

-------

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते कि, पेनगंगा ओपन कास्ट मायनिंग मध्ये समाविष्ट 46.04 हे. वनजमिनीचे वनसंवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत वळतीकरणाचे प्राप्त प्रस्तावाची छानणी केली असता खालील प्रमाणे तृटया निदर्शनास आलेल्या आहेत.

1. प्रस्तावातील पान क्र. 99 वर प्रस्तावीत क्षेत्रात उभ्या असलेल्या 516 झाडांची तोड होत आहे. त्यानुसार त्यापासून प्राप्त होणारे उत्पादन (इमारती लाकूड, जळावू) बाबतचे विवरणासह वृक्षतोडीचे अंदाजपक जोडण्यात यावे.
2. उपवनसंरक्षक यांनी वृक्षतोडीचे प्रमाणपत्र प्रस्तावात जोडलेले नाही.
3. जिल्हयातील Identified forest ची यादी जोडण्यात आलेली नाही.
4. जिल्हाधिकारी यांचे FRA 2006 अंतर्गत प्रमाणपत्र जोडण्यात आलेले नाही. अथवा त्याबाबत प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र जोडण्यात आलेले नाही.
5. Chronology of Event जोडण्यात आलेले नाही.
6. प्रस्तावातील पान क्र. 94 ते 97 वर पर्यायी वनिकरणाची योजना Ready Recknor नुसार सन 2015-16 चे प्रति हेक्टरी 410350 रु. प्रमाणे पर्यायी वनिकरण योजना तयार करून जोडण्यात यावी.
7. प्रस्तावातील पान क्र. 91 वरील SIR मधील मुद्दा क्र. 8 मध्ये दिलेल्या विवरणाचे संदर्भात आवश्यक Note तयार करून जोडण्यात यावी.
8. सदर प्रकल्पाचे सभोवतालचे परिसरात वन्यप्राण्यांचे भ्रमण व अधिवास असल्याने (वन्यप्राण्यांचे संवर्धनाकरीता) AVifauna/Wildlife Mitigation Plan करीता प्रकल्प यंत्रणेकडून 30 लाख रु. भरणा करण्यास तयार असल्याबाबतचे प्रकल्प यंत्रणेचे हमीपत्र जोडण्यात यावे. व Wildlife Mitigation Plan तयार करण्यात यावा.
9. Online submission चे प्रपत्रामध्ये UA व आपले आवश्यक प्रमाणपत्र व दस्तावेज Additional Document मध्ये जोडण्यात आलेले नाही.
10. Part II मध्ये माहिती/प्रमाणपत्र enclose (जोडल्याचे) नमुद केले आहे. परंतू सदरची माहिती/प्रमाणपत्र कोणत्या पान क्रमांकावर आहे ते नमुद केलेले नाही.

तरी वरील प्रमाणे पुर्ततेकरीता प्रस्तावाच्या दोन प्रति यासोबत परत करण्यात येत असून मुद्दयांची परिपूर्ण पुर्तता करून व Online submission मध्ये आवश्यक त्या दुरस्त्या करून परिपूर्ण प्रस्ताव 5 प्रतित या कार्यालयास सादर करावे.

**सहपत्र :** वरील प्रमाणे

**मुख्य वनसंरक्षक,**
**चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर**

13/05

**प्रति,**
**उपवनसंरक्षक,**
**मध्य चांदा वनविभाग,**
**चंद्रपूर.**

**प्रतिलिपी :** महाप्रबंधक, डब्ल्यू.सी.एल. वणी एरीया उर्जाग्राम, पोष्ट ताडाली, जि. चंद्रपूर यांना माहीती तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.